जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर

न्याय सेवा सदन, जिल्हा न्यायालय, चंद्रपूर
ई–मेल आयडी – chand-dlsa.mh@bhc.gov.in
दूरध्वनी कं._07172–271679, भ्रमणध्वनी क. 8591903934

जाहिरात दिनांकः– ०५ डिसेंबर, २०२५
अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख २० डिसेंबर, २०२५, सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत.

कंत्राटी आधारावर लेखापाल (Accountant)

चंद्रपूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण करीता खालील पद निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने करीता भरावयाचे आहे.

पदाचे नाव व पात्रता

अ. कं.	पदाचे नाव	संख्या	शैक्षणिक पात्रता (कमीत कमी)	एकत्रीत वेतन (सर्व भत्ते मिळून दरमहा)
१.	लेखापाल (Accountant)	१	१. उमेदवार कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापीठातून किमान वाणिज्य पदवीधर असावा. वाणिज्य शाखेत पदव्युत्तर पदवी असल्यास प्राधान्य देण्यात हेईल. २. संगणकाचे ज्ञान – टॅली, एम.एस.सी.आय.टी. तसेच संबंधीत अकाऊन्ट सॉफ्टवेअरची माहिती. ३. टंकलेखन गती – उमेदवाराचा टंकलेखनाचा वेग ३० श.प्र.मी. पेक्षा कमी नसावा (मराठी व इंग्रजी) ४. कामाचा अनुभव – कोणत्याही संस्थेत लेखापाल म्हणून तीन वर्षाचा कामाचा अनुभव असणे आवश्यक.	३५,०००/–

अटी व शर्ती

१. सदरचे पद ही निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाचे असून फक्त ११ महिने या कालावधीसाठी कंत्राटी स्वरूपात भरण्यात येणार आहे. उमेदवाराचा या पदावर नोकरी कायम करणेबाबत कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.

२. या सोबत अर्जाचा नमूना दिलेला असून त्या पध्दतीचा अर्ज अर्जदाराने शनिवार दिनांक २०/१२/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत प्रत्यक्ष अथवा नोंदणीकृत डाकेने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर या कार्यालयाचे पुढील पत्यावर पोहचतील अशाप्रकारे दाखल करावा. त्यानंतर आलेल्या अर्जाचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

अर्ज दाखल करण्याचा पत्ता :—

मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,

न्याय सेवा सदन इमारत, जिल्हा न्यायालय, चंद्रपूर — पिन क्रं. ४४२ ४०१.

३. अर्जावर/पोष्टाच्या लिफाफयावर कोणत्या पदाकरीता अर्ज केला आहे ते स्पष्टपणे नमूद करावे तसे नसल्यास अर्ज अपूर्ण समजून त्याचा विचार केला जाणार नाही.

४. अर्जासोबत शैक्षणिक पात्रतेबाबत स्वयंसाक्षांकित प्रती दाखल करावेत.

५. निवड करण्यात आलेल्या उमेदवाराने प्राधिकरणाकडे करारनामा लिहून दयावयाचा आहे.

६. नेमणूकीनंतर उमेदवारास कोणतेही कारण न देता व कोणतेही पूर्व सुचना न देता नोकरीतून कमी करण्याचा अधिकार प्राधिकरणास राहील.

७. उमेदवारास नेमणूकीच्या कालावधीपूर्वी नोकरी सोडावयाची असल्यास दोन महिन्याचे आगाऊ सूचना किंवा एक महिन्याचा ढोबळ/स्थूल पगार या प्राधिकरणाकडे जमा करावा लागेल.

८. एकत्रित वेतन हे मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांनी ठरवून दिल्याप्रमाणे असेल.

९. भरती प्रक्रियेच्या माहिती करीता अर्जदाराने जिल्हा न्यायालय, चंद्रपूर यांच्या अधिकृत संकेतस्थळ **https://districts.ecourts.gov.in/chandrapur** यास भेट दयावी.

१०. पात्र उमेदवारांची यादी मंगळवार दिनांक २४/१२/२०२५ रोजी जिल्हा न्यायालय, चंद्रपूर या अधिकृत संकेतस्थळ **https://districts.ecourts.gov.in/chandrapur** यावर प्रसिध्द करण्यात येईल.

११. मुलाखतीकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांना मुलाखतीची तारीख अधिकृत संकेतस्थळ **https://districts.ecourts.gov.in/chandrapur** नंतर कळविण्यात येईल.

स्थळ :— चंद्रपूर
दिनांक :— ०५/१२/२०२५

(सुधीर एस. इंगळे)
सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
चंद्रपूर

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर

अंतर्गत

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर करीता निव्वळ तातपुरत्या स्वरूपात ११ महिने या_कालावधीकरीता लेखापाल_कंत्राटी आधारावर लेखापाल (Accountant) या पदासाठी अर्ज करण्याचा नमूना.

१. अर्जदाराचे संपुर्ण नांव व पत्ता :—

२. जन्म तारीख :—

३. उमेदवाराचे जाहिरातीच्या दिवशीचे वय :—

४. आधारकार्ड क्रमांक :—

५. मोबाईल क्रमांक व ई—मेल आयडी :—

६. शैक्षणिक अर्हता :—

अ. क्रं.	शैक्षणिक अर्हता	विद्यापीठ	उत्तीर्ण वर्षे	टक्केवारी

७. ईतर शैक्षणिक अर्हता :—

अ. क्रं.	शैक्षणिक अर्हता	बोर्ड / संस्था	उत्तीर्ण वर्षे	टक्केवारी / गुण

८. अनुभव :—

अ. क्रं.	कार्यालय	पद	कालावधी

९. सोबत कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

अर्जदाराचे पूर्ण नाव व स्वाक्षरी

अर्जदाराचे हमीपत्र

मी, याव्दारे, घोषित करतो/करते की, माझ्याव्दारे दिलेली वरील सर्व माहिती बरोबर आहे आणि जर काही चुकीचे आढळले तर माझी उमेदवारी रद्द होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :—

दिनांक :— उमेदवाराची स्वाक्षरी